

''आता फक्त हाती पिसांच्या उशा ह्या ...''

**प्रसंग -**

बायको माहेरी गेलेली आहे. नायक नम्बर १, अजय DEPRESSED झालेला आहे. काय करावे हे त्याला कळत नाही. तिच्या हातच्या गोड चहाची तसेच ईतर गोष्टींची त्याला पुष्कळ आठवण येत आहे.

प्रियेचा (म्हणजे प्रिय बायकोचा) चेहरा त्याच्या डोळ्यासमोर एकसारखा येत आहे .... तळमळून गात आहे ...



# प्रिया आज नाही

(चाल - प्रिया आज नाही,मला साथ द्याया ....)

अजय - प्रिया आज नाही, मला चहा कराया
कुठे दूध साखर मी,जाऊ शोधाया

गेली दोन महिने जी माहेरी ती गेली
जरा नाही चिंता तिला ह्या घराची
सुकत चाललो मी हा कुणी ना बघाया
प्रिया आज .....

उपास रोज होई किती सोसू त्रास
तो PLAYBOY देई डोळ्यास आभास
कुणा सांगू बोला मनाच्या व्यथा ह्या
प्रिया आज .....

स्मरे रोज मज ती, तिची गोड हाक
पुरे TV तो आता, किती पाहू वाट
आता फक्त हाती, पिसांच्या उशा ह्या
प्रिया आज .....